दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५५ वा | मंगळवार दि. ११ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## कार्यक्रमात आमचाही झेंडा लावा; अजित पवार

**धुळे ।** सरकारच्या 'शासन आपल्या दारी' हा कार्यक्रम धुळे शहरात पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यक्रमात झेंड्यावरुन अजित पवार यांनी केलेलं वक्तव्य सध्या चर्चेत आले आहे. तर भरसभेतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अजित पवार यांना प्रत्युत्तर देत तुमची मागणी मान्य केली जाईल, असा विश्वास दिला. त्यामुळे सभास्थानी हास्य पिकल्याचे देखील पाहायला मिळाले.

# शासन आपल्या दारी, नागरिकांना त्रास भारी

**धुळे । पुरुषोत्तम पाटील**

'शासन आपल्या दारी नागरिकांना त्रास भारी' असे म्हणायची वेळ धुळे जिल्ह्यातील नागरिकांवर आली. राज्य सरकारच्या शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे धुळे जिल्ह्याकडे जात असताना खराब हवामानामुळे त्यांचे विमान वळवावे लागले. त्यांचे विमान धुळे जिल्ह्यात न उतरवता जळगाव जिल्ह्यात उतरवण्यात आले. एकनाथ शिंदे यांचा ताफा धुळ्याच्या दिशेला जात असताना फागणे गावाजवळ एका अज्ञात व्यक्तीने काळे झेंडे दाखवले. त्यामुळे वातावरणात काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता. कार्यक्रमास उशीर होऊ लागल्याने सकाळी आठपासून आलेल्या कार्यकर्त्यांची चुळबूळ वाढू लागली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री येईपर्यंत उपस्थितांना थोपवून ठेवण्यासाठी मंत्र्यांनी, आमदारांनी खिंड लढविण्यास सुरुवात केली.

जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पवार सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. सकाळी ११ वाजता आदिवासी नृत्य झाले असतानाही दुपारी तीन वाजता पुन्हा त्यांचे नृत्य सादर करण्यात आल्याने अखेर सूत्रसंचालकाने त्यांना आता आराम द्या, असे म्हणत पोलीस बँड पथकाला बोलावून सावरकरांच्या आठवणी जागे करणारे जयोस्तुते गीताची धून वाजवली. तीही तांत्रिक कारणाने बंद करावी लागल्याने उपस्थितांचा प्रचंड हिरमोड झाला. दरम्यान, काही वेळा पाऊसही झाल्याने कार्यक्रमास्थळी धांदल उडाली. उपस्थितांच्या नजरा मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याकडे लागलेल्या होत्या.









### आगमनाच्या आधीच रांगोळी पुसली

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वागतासाठी जी रांगोळी काढण्यात आली होती. ती मात्र त्यांच्या स्वागताच्या आधी पुसली गेली. तसेच पाऊसामुळे कार्यकत्यांसह सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल देखील झाले.









(सर्व छायाचित्रे : दिपक वाघ)

### गरीब दुबळ्या जनतेला पाजले मंडप पढान्हीचे पाणी

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचा धुळे जिल्हा दौरा असल्याने शासन आपल्या दारी या उपक्रमासाठी ते धुळे जिल्ह्यात आले. त्यानिमित्ताने त्यांच्या मार्फत साक्री ता.आमदार तथा धुळे माजी महापौर मंजुळा गावित घरासमोर असलेल्या धर्मवीर आनंद दिघे उद्यान लोकार्पण सोहळा आज पार पडला असून त्या निमित्ताने या ठिकाणी विविध खेड्यापाड्यावरील नागरिक, जनता, स्थानिक नागरिक देखील उपस्थित होते. तर यावेळेस नागरिकांना आमदार मंजुळा गावित यांच्या वतीने नास्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु यावेळेस नागरिकांनी नाश्ता तर केला परंतु नागरिकांना या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या पाण्यापासून आमदार मंजुळा गावित यांनी वंचित ठेवले. चक्क कार्यक्रमासाठी उभारलेल्या मंडपाच्या ताडपत्रीच्या पढान्हीतून आलेले पाणी टाकी भरुन पाणी टाकून नागरिकांना पिण्यास दिले. त्यामुळे नागरिकांची एक क्रुचेष्टा करण्यात आली. नागरिकांवर एक प्रकारे अन्याय केला असून एक तर धुळेकरांना भाजप पदाधिकारी सांगतात की धुळ्याला एक दिवसाआड पाणी देऊ परंतु येथे तर नागरिकांची अतिशय अवहेलना करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### कचरा कुंडीची व्यवस्था नाही

धुळे शहरातील नवीन मनपाच्या जवळ पोलीस व लाभार्थी यांच्या साठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र कचरा कुंडीची व्यवस्था नसल्याने अनेकांनी कचरा गटारात टाकला.

### शासन आपल्या दारी, जनता मात्र परतली घरोघरी...

राज्य सरकारच्या शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे धुळे जिल्ह्यात आले होते. मात्र त्यांना सलग पाच तास उशीर झाल्याने कार्यक्रमाच्या अधिक अनेक नागरिक आपल्या घराकडे परततांना दिसत होते.यामुळे मात्र उपस्थितांचा प्रचंड हिरमोड झाला. दरम्यान, काही वेळ पाऊसही झाल्याने कार्यक्रमास्थळी धांदल उडाली होती.

### महिला पावसात भिजल्या

राज्य सरकारच्या शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे धुळे जिल्ह्याकडे जात असताना खराब हवामानामुळे त्यांचे विमान वळवावे लागले. त्यांचे विमान धुळे जिल्ह्यात न उतरवता जळगाव जिल्ह्यात उतरवण्यात आले.त्यांना नियोजित कार्यक्रमस्थळी पोहोचण्यास विलंब झाला. मात्र त्यांच्या स्वागतासाठी ज्या महिला आलेल्या होत्या. त्यांना मात्र भर पाऊसात उभे राहून होते. मात्र त्यांच्यासाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.



### बॅनर पडले

शासन आपल्या दारी उपक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शहरात आले होते. त्यांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले. बॅनर कुठे उलटे तर कोठे पडलेले दिसून आले. यामुळे मात्र अपघाताचा धोका टळला.

## न्यूज कॉलम

### जाब विचारणाऱ्या सासूला सुनेसह दमदाटी

**धुळे ।** लहान सुनेने केलेल्या फोनबद्दल विचारणा करणार्या सासुबाईस सुनेने मारहाण केली तर शिरपूर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल पदावर कार्यरत असलेल्या लहान मुलाने शिवीगाळ करीत आम्ही या घरातून निघणार नाही, अशी दमबाजी केली. लताबाई भाईदास पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,त्यांच्या रहात्या घरी लहान सुनेस त्यांनी तुझ्या आईने माझ्या मोठ्या मुलीच्या सासर्याला फोनवरून तुम्ही तुमचे व्याहींना सांगावे की, मोठ्या नणंदेस शिरपूर येथील पत्त्यावर राहू द्या व त्यात हिस्सा द्या, अशी विचारणा केल्याबद्दल विचारले. त्यामुळे राग आलेल्या सुनेने मारहाण करून शिवीगाळ केली.

### प्रियदर्शनी कॉलनीत घरफोडी; मुद्देमाल लंपास

**शिरपूर ।** निमझरी नाक्याजवळील प्रियदर्शनी कॉलनी येथे चोरट्याने धाडसी घरफोडी करीत दहा हजारांच्या रोकडसह सोन्या-चांदीचे दागिने व इतर साहित्य मिळून एकूण ८३ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला. श्याम मुरलीधर परीख यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील दहा हजार रूपयांच्या रोकडसह एकूण ८३ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला.

## ५० खोके एकदम ओकेच्या घोषणा; ठाकरे गटाचे शिवसैनिक ताब्यात



**धुळे ।** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शासन आपल्या दारी या कार्यक्रमासाठी धुळ्यात येत आले होते. मात्र ते पोहोचण्यापूर्वी उद्धव ठाकरे शिवसैनिकांनी दत्त मंदिर चौक परिसरात ५० खोके एकदम ओकेच्या घोषणा दिल्या. आक्रमक झालेल्या ठाकरे गटाच्या शिवसैनिकांना पोलीस प्रशासनाने तात्काळ ताब्यात घेतले.

शासन आपल्या दारी हा राज्य सरकारचा कार्यक्रम मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये धुळ्यात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रशासनातर्फे जय्यत तयारी करण्यात आली होती. पोलीस फौज फाटा देखील या ठिकाणी तैनात करण्यात आला होता. कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनातर्फे सर्वतोपरी तयारी ही करण्यात आली. परंत, कार्यक्रमाला मुख्यमंत्री शिंदे हे येतील यापुर्वीच ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी प्रचंड घोषणाबाजी केली. तसेच धुळे महानगरपालिकेमध्ये सत्ताधारी भाजपच्या नेत्यांकडून सुरू असलेला भ्रष्टाचार रोखण्याची मागणी केली आहे. यावेळी पोलिसांनी शिवसैनिकांना ताब्यात घेतले आहे.

## धुळ्यातील स्वर्ण पॅलेसमध्ये चोरी एक कोटी १० लाखांचा मुद्देमाल लंपास

**धुळे । प्रतिनिधी**

येथील सराफ बाजारातील एका सोन्या-चांदीच्या दुकानातून चोरट्यांनी तब्बल एक कोटीपेक्षा अधिक रुपयांचे दागिने लंपास केले. मध्यरात्री ही घटना घडली असून आज सकाळी हा प्रकार उघडकीस आला. त्यामुळे शहरातील व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेतील सराफ बाजारात स्वर्ण पॅलेस सोने-चांदीचे दागिन्याचे दुकान आहे. आज सकाळी दुकान उघडल्यानंतर दुकानातील काही ठिकाणचे काच तुटल्याचे दिसले. तसेच दागिनेही गहाळ झाल्याचे आढळले. मालक सरदार चौधरी यांनी याबाबत आझाद नगर पोलिसांना माहिती दिली. आझाद नगर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. दुकानातील सीसीटीव्हीचे फुटेज तपासण्यात आले. यावेळी दुकानाच्या मागील दरवाजाने चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. दुकानातील शोकेस मधून आणि विविध ठिकाणी ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने काढून घेत चोरटे पसार झाले. चोरट्यांनी चेहऱ्यावर काळे कापड बांधले होते. तसेच तीन चोरट्यांनी दुकानात प्रवेश केल्याचेही दिसून येत आहे. तोंडाला कापड असल्याने चोरट्यांची ओळख पटू शकलेली नाही. प्राथमिक स्वरूपात चोरीस गेलेल्या दागिन्यांची किंमत एक कोटीपेक्षा अधिक असल्याचे आढळले. आझाद नगर पोलिसांकडून माहिती घेण्याचे काम सुरू असून उशिरा गुन्हा दाखल झाला. दरम्यान, सराफ बाजार हा शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत आहे, दिवसभर रात्री उशिरापर्यंत हा परिसर गजबजलेला असतो. तरीही चोरट्यांनी मध्यरात्री दुकानातील मागील दरवाजा प्रवेश करीत दागिने लांपास केल्याने व्यवसायिकांमध्ये भीती व्यक्त होत आहे.



### कॅबीन फोडून दागिने लंपास!

**चोरट्यांनी दुकानात प्रवेश केल्यानंतर दुकानातील मुख्य कॅबीनचा काच फोडून ते आत शिरले. यावेळी काचेच्या काऊंटरच्या ब्लॉकमध्ये ठेवलेल ८०० ग्रॅम वजनाचे शुद्ध सोने त्यात वेढे व गिन्नी, ७२० ग्रॅम वजनाचे वेगवेगळे दागिने, १० किलो चांदी व तसेच ड्रॉव्हर तोडून १० हजार रुपयांची रोकड असा सुमारे १ कोटी १० लाख रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. शिवाय दुकानाचा स्टॉक मोजणे सुरु असून त्यानंतर आणखी काही चोरीस गेले आहे का, हे समजू शकणार आहे.**

## आनंद लोंढे यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई



हंडा भेट आंदोलन पोलिस प्रशासन दाबण्याचा प्रयत्न करीत आहे : लोंढे

**धुळे ।** शासन आपल्या दारी उपक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शहरात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या विषयांवर आंदोलन करणारे आझाद समाज पक्षाचे आनंद लोंढे यांना पोलिसांनी सकाळी ताब्यात घेतले. जनतेच्या प्रश्नासाठी होणाऱ्या आंदोलनाची धास्ती घेत मध्यरात्रीपासूनच पोलिसांनी सत्ताधारी पक्षाच्या दडपशाहीला शरण जात आपणास ताब्यात घेतल्याचा आरोप लोंढे यांनी केला.

शहर पोलिसांनी आनंद लोंढे यांना ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणले. यावेळी आनंद लोंढे प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना म्हणाले की, जनतेच्या प्रश्नांसाठी होणार्या आंदोलनाची धास्ती घेत मध्यरात्रीपासूनच पोलिसांनी सत्ताधारी पक्षाच्या दडपशाहीला शरण जात आम्हाला ताब्यात घेतले. एक दिवसाआड नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन सत्ताधारी भाजपने दिले होते, मात्र, सदर आश्वासन पुर्ण न झाल्याने जनतेच्या अपेक्षा फोल ठरल्या आहेत. महापालिका प्रशासन व सत्ताधारी भाजपा आपल्या मस्तीत मस्त असल्याचा आरोपही यावेळी आनंद लोंढे यांनी केला. यावेळी त्यांच्यासमवेत समता समाज संघाचे किरण गायकवाड, आरपीआय आठवले गटाच्या नैना दामोदर, अंजना चव्हाण, सोनल मराठे, निलेश जिरे, रोहित सोनवणे, अनिल ठाकरे, विक्की लोंढे, मनोज आहीरे आदी उपस्थित होते. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या दौर्यानिमित्त आनंद लोंढे यांच्या नेतृत्वात पाणीप्रश्नासाठी आंदोलन केले जाणार होते.

## मुख्यमंत्र्यांच्या सभेच्या प्रवेशद्वारावर गीतांजली कोळींचा आत्मदहनाचा प्रयत्न



**धुळे ।** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धुळ्यातील सभास्थळी सामाजिक कार्यकर्त्या गीतांजली कोळी यांनी सभा सुरु असताना आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी टोकरे कोळी समाजाला जातीचे दाखले मिळण्याबाबत गीतांजली कोळी सातत्याने मोर्चे, आंदोलने, निवेदने या माध्यमातून पाठपुरावा करीत आहेत.

गेल्या आठवड्यातच त्यांनी प्रशासनाला निवेदन देवून १० जुलै रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. पोलीस प्रशासनाने कोळी यांना आत्मदहनापासून रोखण्यासाठी ताब्यात घेण्याबाबत शोध घेतला होता. मात्र त्या पोलीसांच्या हाती लागल्या नाहीत. त्या थेट सभास्थळाच्या प्रवेशद्वारावर पोहचल्या. कुणाचेही त्यांच्याकडे लक्ष नव्हते. कोळी या सोबत आणलेल्या बाटलीतील ज्वलनशील द्रव्य अंगावर ओतत असल्याचे लक्षात येताच तिथे ड्युटीवर असलेल्या आरटीओ विभागाचे अधिकारी, कर्मचारींनी कोळींना रोखून तात्काळ ताब्यात घेतले. मला मुख्यमंत्रींना भेटून बोलू द्या अशी मागणी कोळींनी लावून धरली.

## मुख्यमंत्र्यांच्या शासकीय कार्यक्रमात राजकीय टोलेबाजीच जास्त

दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा चुराडा झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमातून आपल्या पदरी काही ठोस पडेल, ही धुळेकरांची अपेक्षा फोल ठरली. जळगाव, धुळे येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्यासह सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या आश्वासनांवर जिल्ह्याची बोळवण करण्यात आली. विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, यासारख्या नेहमीच्या घोषणा करण्यात येत असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाबीकडे बाबत गप्प राहणेच पसंत केले. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारवर स्तुतीसुमने उधळत आपले अध्यक्षीय भाषण संपविले. त्यानंतर मंगेश चव्हाण, जयकुमार रावल या आमदारांसह मंत्री दादा भुसे यांचेही भाषण झाले.

येथे आयोजित शासन आपल्या दारी कार्यक्रम वेगवेगळ्या विषयांमुळे चर्चेत राहिला. जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या लाभार्थ्यांना चार ते पाच तास थांबून राहावे लागल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. शासनाने मोठा गाजावाजा करत शासन आपल्या दारी ही योजना राबवली खरी मात्र धुळे जिल्ह्यात या योजनेबाबत सध्या उलट सुलट चर्चा सुरू आहे. या योजनेत शासन आपल्या दारी असले तरी सर्वसामान्य जनतेला अगदी शिरपूर पासून धुळ्यापर्यंत नागरिकांना बोलवल होते. यावर कोट्यावधी रुपयाचा खर्च केला जात आहे. शासन आपल्या दारी मग कशाला हवी वारी? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. शासन आपल्या दारी योजनेतून सर्वसामान्य नागरिकांना तातडीने फायदा मिळावा हा हेतू शिंदे-फडणवीस सरकारने ठेवला असताना, मोठा गाजावाजा करीत कोट्यवधी रुपयांचा चुराडा करण्याचे कारण काय? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.





शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.७०५७०१११२६

### कोट्यवधी रुपयांचा चुराडा कशासाठी?

**लाभार्थ्यांच्या नावांची यादी तयार करुन प्रशासनाला पोहचवण्यात आल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत लाभार्थी आले पाहिजेत यासाठी तलाठी, ग्रामसेवकांनाही 'कामा'ला लावण्यात आले आहे. एका दाखल्यासाठी संपूर्ण दिवस कशाला फुकट घालवायचा असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. ग्रामपंचायतीमध्ये दाखल्यांचे वाटप झाले असते तर ही योजना खरोखर 'दारा'पर्यंत पोहचल्याचे समाधान वाटले असते अशा प्रतिक्रियाही आता उमटत आहेत. या योजनेचा गाजावाजा करण्यासाठी त्यावर कोट्यवधी रुपयांचा चुराडा कशासाठी असा प्रश्न उपस्थित करीत शासन आपल्या दारी मग तासभराच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची कशाला हवी वारी' अशा चर्चा आता गावकीच्या चावड्यांवर रंगू लागल्या आहेत.**

## उपमुख्यमंत्री अजित पवारांशी पोपटराव सोनवणेंची सदिच्छा भेट



**धुळे । धुळ्यात 'शासन आपल्या दारी' या राज्य शासनाच्या उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेसाठी सोबत उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील आले होते. यावेळी धुळे जि.प. चे सदस्य पोपटराव सोनवणे यांनी सभा संपल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी पवार यांनी प्रतिसाद देवून सोनवणे यांच्याशी हस्तांदोलन करीत संवाद साधला.**

## वैयक्तिक आणि खासगी

देशात डिजिटल अर्थव्यवस्था अत्यंत वेगाने वाढत आहे. त्यामुळे माहितीचे संरक्षण करण्यासाठी मजबूत व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. मात्र, हे विधेयक अधिक स्पष्ट हवे व त्यावर व्यापक चर्चा झाली पाहिजे.

वैयक्तिक डिजिटल माहिती संरक्षण विधेयकाच्या मसुद्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने ते संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात मांडले जाईल. हे विधेयक सुमारे सहा वर्षे तयार होत होते. ऑगस्ट २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'खासगीपणा हा मूलभूत हक्क' असल्याचा निर्वाळा दिला होता. त्यानंतर तसा कायदा बनवण्याच्या दिशेने हालचाल सुरू झाली. सध्याच्या काळात आर्थिक देवघेव यासह असंख्य व्यवहार 'डिजिटल' पद्धतीने होत आहेत. यामध्ये वापरकर्त्यांची (यूजर) माहिती सुरक्षित राहावी हा या प्रस्तावित कायद्याचा मुख्य हेतु आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांचाही यात विचार करण्यात आला आहे. वैयक्तिक माहिती जाहीर करणे, अन्य कोणा संस्थेस वा व्यक्तीस देणे अशा स्वरूपात नियोजित कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधितास २५० कोटी रुपये दंड ठोठावण्याची तरतूद या विधेयकात आहे. गेल्या वर्षी या विधेयकाचा एक मसुदा मंत्रिमंडळाने मान्य करून प्रसिद्ध केला होता. त्यावर टीका झाल्याने त्यात बदल करून नवा मसुदा तयार करण्यात आला आहे. पण, मागील मसुद्यातील केंद्र सरकारला व्यापक अधिकार देणे यासह जे मुद्दे वादग्रस्त ठरले होते त्यापैकी काही नव्या मसुद्यातही कायम आहेत. त्यांची पुन्हा बारकाईने तपासणी होणे गरजेचे आहे.


सरकारला 'सवलत' का?

माहिती घेण्यासाठी किंवा ऑनलाइन खरेदी करण्यासाठी एखादी व्यक्ती इंटरनेटद्वारे एखाद्या संकेतस्थळास(वेबसाइट) भेट देते. त्यावेळी ती संस्था अथवा वेबसाइट 'कुकीज' वापरते. त्याद्वारे वापरकर्त्याची माहिती संबंधित वेबसाइटला मिळते. अशा प्रकारे जमा केलेली माहिती कशी साठवणार, तिचा वापर कधी व कसा केला जाणार हे संबंधितांना स्पष्ट करावे लागणार आहे. केंद्र सरकार माहिती संरक्षण मंडळ (डेटा प्रोटेक्शन बोर्ड) स्थापन करणार आहे, त्याची यावर देखरेख राहणार आहे. मंडळाचे सर्व सदस्य सरकारच निवडणार आहे. या नियोजित कायद्याचा पहिला मसुदा न्यायमूर्ती श्रीकृष्ण यांनी २०१८मध्ये बनवला होता. नंतर त्यात बदल झाले. मंडळाच्या सदस्यांची पात्रता, त्यांच्या नेमणुकीची पद्धत, त्यांचा कार्यकाळ आदी सर्व बाबी केंद्राच्या अखत्यारीत राहणार आहेत. श्रीकृष्ण यांच्या म्हणण्यानुसार हे मंडळ सरकारला बांधील राहणार आहे. त्याचप्रमाणे सरकार व अनेक सरकारी विभाग / संस्था यांना या विधेयकातून सवलत दिली गेली आहे; ही धोकादायक बाब असल्याचे त्यांचे मत आहे. नवा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर इंटरनेट वापरकर्त्यांच्या संघटना व अनेक तज्ज्ञांनी हे विधेयक सदोष असल्याचे मत व्यक्त केले होते. त्याचे कारण अनेक बाबी यात स्पष्ट नाहीत. सरकार व त्याच्या अनेक संस्था नागरिकांची माहिती मोठ्या प्रमाणावर जमा करतात. त्याचा गैरवापर झाल्यास, काही विपरीत परिणाम झाल्यास राष्ट्रीय सुरक्षितता, परदेशांशी संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था कायम राखणे या कारणांखाली 'कोणत्याही सरकारी संस्था/विभाग यांना कायद्याच्या तरतुदीतून वगळण्याचा हक्क सरकारकडे राहणार आहे. यामुळे सरकारकडे जमा झालेल्या प्रचंड माहितीचा दुरुपयोग होण्याची भीती बळावते. वापरकर्त्यांच्या व संस्थांच्या तक्रारी किंवा गार्हाणी यांची दखल घेणे व सोडवणे, कायद्याचे पालन होत आहे की नाही हे बघणे, यांची जबाबदारी व अधिकार मंडळाच्या ज्या प्रमुख अधिकार्याकडे असतील त्याची निवड व नियुक्ती सरकार करणार आहे. घटनात्मक संस्थांच्या स्वातंत्र्याविषयी व स्वायत्ततेविषयी गेली काही वर्षे देशात व परदेशातही चिंता व्यक्त होत आहे. अशा वातावरणात हे मंडळ किती स्वतंत्रपणे काम करू शकेल याविषयी शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

परदेशांत माहिती पाठवण्यावर 'ब्लॅक लिस्ट'द्वारे निर्बंध घातले जाणार आहेत. ते देश किंवा त्या संस्था कशाच्या आधारे सरकार निवडणार? भू राजकीय परिस्थितीचा त्यात विचार होणार का? कायद्याच्या उल्लंघनाच्या 'प्रत्येक प्रसंगास' २५० कोटी रुपये दंड होणार आहे. ते प्रसंग कोणते? यात अधिक स्पष्टता आवश्यक आहे. अखेरीस, भारतीय नागरिकाची वैयक्तिकता व त्याचे खासगीपण जपण्यास या विधेयकाने महत्त्व दिले पाहिजे.

# मौलिक काव्य संग्रहाचा सुंदर मराठी भावानुवाद : अंतर्मुख

सुप्रसिद्ध तेलुगु कवी रोक्कम कामेश्वरराव यांच्या अंतर्मुख या मूळ तेलुगु काव्यसंग्रहाचा ह्या आधीच इंग्रजी, हिंदी, तामीळ व कन्नड भाषेतून अनुवाद झालेला आहे. आता ह्या मौलिक काव्यसंग्रहाचा सुंदर मराठी भावानुवाद व्यंकटेश देवनपल्ली यांनी केला आहे.




अंतर्मुखमधील कविता वाचताना, रोक्कम कामेश्वरराव म्हणजे स्वतःचा मार्ग स्वतःच शोधत जाणारे कवी आहेत आणि इतरांनाही आत्मशोधास प्रवृत्त करून जाणिवेच्या उच्च स्तरावर नेण्यासाठी एक बांधिलकी म्हणून स्वीकारत आहेत, हे प्रकर्षाने जाणवत राहते. मूलतः कविच्या भावाविष्कारात आत्म अनुभवाचे, साधनेचे आणि सत्याचे अधिष्ठान असल्याने कवीची प्रत्येक कविता ही एका संदेशाच्या रूपात प्रकट होते. कधी ती शांतिदूत होते तर कधी प्रीतीदूत बनते. सत्यशोधनाच्या मार्गावर असलेला कवी जीवनवृक्षाच्या मुळाशी लपलेल्या सत्य, प्रेम, शांती, करूणा, दयार्द्रता या मूल्यांशी एकनिष्ठ आहे व आत्मब्रह्माशी एकरूप झालेला आहे. परिणामी साधनेच्या आराधनेतून आलेल्या अनुभूतीचा काव्यरुपी परिपाक म्हणजे हा काव्यसंग्रह 'अंतर्मुख'!

'आनंद' या सुरेख सृजनात कवी आपली उदात्त भूमिका स्पष्ट करतो.. 'मी सदैव सत्यासोबत सत्य नेहमी माझ्यासोबत' अशी भावावस्था झाल्यावर कवीला स्वतःचेच चराचरात वसलेले विश्वव्यापी रुप उमगते. कुणी शाप दिला तरी कवीच्या हृदयातून आशीर्वादच निघतात कारण त्याच्या अंतरंगातील द्वेषाचे निर्मूलन झाले आहे आणि परम प्रेम त्याच्या अंतरी विसावलेले आहे.. संकुचित मनाच्या सीमा ओलांडल्यावर, कवीच्या नजरेला सर्वत्र जाणवतो तो निजानंद! त्याला भावते आहे ती आहे जीवनाची सुंदरता! आणि काव्यातल्या प्रत्येक शब्दांत तो कधी निनादत राहतो तर कधी शांततेचे, मौनाचे आणि निःशब्दतेचे अवकाश व्यापत राहतो.

विकास या कवितेत कवी संकोच सोडून पूर्ण उमलण्यासाठी सुंदर संदेश देतो. चैतन्याच्या खोलात..प्रवाहित होऊन जा..स्वतःच्या अस्तित्वाशी लयबद्ध होऊन आसमंत गंधित कर. असे सांगतो. 'तडफड' या काव्यातही कवीची केंद्राच्या दिशेने वाटचाल सुरू करण्यास प्रवृत्त करणारी प्रामाणिक तळमळ दिसून येते. प्रत्येक रचना ही वाचकाला अंतर्मुख करण्यास.. आत्मपरिवर्तन घडवण्यासाठी प्रेरक अशीच आहे. इतकेच नव्हे तर अहंकार बर्फासारखा वितळायला हवा.. आत्मनिष्ठ व्हायला हवे.. तरच स्व-स्वरुपाचे.. कुणाशीही तुलना न करता येणारे अनुपम असे सत्याचे प्रतिबिंब दिसेल.. अन्यथा वसंत ऋतूही पाठ फिरवेल असा स्पष्ट इशारा ते देतात. काही मानवी स्वभाव दोष, विसंगती ज्या आध्यात्मिक यात्रेतील व्यवधान ठरू शकतात आणि त्यांचा निषेध करून कोणते गुण जोपासायला हवेत हे स्पष्टपणे दाखवून देतात. स्मरण या कवितेत, मन आणि वाचा एकत्र करून तुझ्या दारात उभा आहे. माझा मार्ग आणि गंतव्यस्थान.. हितचिंतक.. निकटवर्ती तूच आहेस.. तुझी एकात्मता सदैव अनुभवण्यासाठी मला आशीर्वाद दे.. प्रभूचे कधीही विस्मरण होऊ नये.. यासाठी मनोमन स्मरण करतो. भार या कवितेत निर्भार होऊन.. सतत जागरूक राहून.. जिवाशिवाचे ऐक्य होण्याच्या सूर्योदयाची कवी आतुरतेने प्रतिक्षा करतो.



सुलेखा जक्कल
९२७००६४७२९

ज्या विजयामुळे आत्मिक विकास, प्रगति साधली जात नाही.. आत्म्यास पोषक नसणारे.. त्याला संतोष न देणारे कोणतेही कृत्य निरर्थक आहे.. आंतरिक विजयात खरी शान आहे.. तीर्थाटन, देशाटन करूनही तुम्ही जर बदलला नसाल .. स्वतःचे स्वतः मधील अंतर मिटवले नसेल तर तो प्रवास उपयोगाचा नाही.. पण तुम्ही जर एकेक पाऊल आत्म्याच्या समीप जाल तर बाह्य जगातील दैदीप्यमान यशापेक्षाही तो विजय अर्थपूर्ण आहे असं कवी ठामपणे सांगतात. 'ये ' या कवितेतून ते अस्थिर करणाऱ्या सर्व नकारात्मक भावना, अहंकार, दंभ, पांडित्य दूर सारून, बाह्य मुखवटे उतरवून.. निर्मल.. स्वच्छ.. नितळ होऊन ये असे ते आवाहन करतात.

'ज्ञानाच्या दिशेने ' या कवितेत सर्व विचारांचे.. विकारांचे विसर्जन करून.. जे संचित आहे ते फेकून रिक्त होऊन.. ते तिरोहित झाले तरच चैतन्याची चाहूल लागेल. असा संकेत कवी देतो. अस्वस्थ होऊन परिमितीमागच्या अपरिमिततेला शोधतो आहे.. आनंदाचे मूळ स्रोत शोधतो आहे.. एका महान तत्वाच्या शोधासाठी.. साक्षात्कारासाठी..'

आपल्याला गवसलेला ज्ञानाचा प्रकाश.. इतरांची जीवनावस्था उन्नत करण्यासाठी वाचकासाठी कवीची काव्यरुपाने ही एक अनुपम भेट आहे. मूळ काव्यातील अर्थगर्भ आशय, विवेक देणारा विचार ह्यांना कुठेही धक्का न लावता, प्रत्येक कविता ही शब्दांतील प्रासादिकता साधत सुरेख अनुवाद केल्यामुळे आपण मूळ तेलुगु कविता न वाचता 'अंतर्मुख' हा मूळ मराठी काव्यसंग्रह वाचत असल्याचा प्रत्यय येतो, हे अनुवादकाचे खरे यश आहे.

कवितांमधून सत्य शिव सौंदर्याच्या अलौकिक तत्वांना स्पर्श करणारा हा काव्यसंग्रह वाचनीय आहे.. प्रत्येक रचना ही प्रबोधनाचा ज्ञानदीप प्रज्वलीत करते. प्रत्येक काव्यातील अर्थसौरभ.. अनुभूतीच्या आत्मगंधाने गंधाळलेला आहे. आत्मशोधातून कवीला गवसलेला आत्मबोध.. अंतरी उमललेले पूर्णत्वाचे ब्रह्मकमळ प्रत्ययास येते. त्यांचे जीवन प्रार्थनामय झाले आहे.. अज्ञाताची साद त्यांना ऐकू येते आहे. सर्व विकारांचा निचरा झाल्यावरच विवेकाचा.. सत्याचा उगम होतो. कवीने जे अनुभवले आहे, ते विश्वकल्याणासाठी मर्यादेच्या पलीकडचे आहे, अनाकलनीय आहे.. ते काव्यरुपात गुंफले आहे. या अंतर्गामी प्रवासाची सुरुवात करण्यासाठी प्रथम पाऊल उचलण्याची प्रेरणा कवी देतो. सत्यशोधनास भावपोषक अशा दिव्य पातळीवर हा काव्यसंग्रह नेतो..

अंतर्मुख हा काव्यसंग्रह आहे .. असे न वाटता ती काव्ययात्रा होते.. सार्थकतेचा यथार्थ बोध देत.. परिघाकडून केंद्रासमीप नेत.. कवीची तीच अभिप्सा आहे.. तोच ध्यास आहे.. जोपर्यंत श्रोते आहेत तोपर्यंत कवी त्यांना सांगत राहणार आहे असे 'एक सांगायचे आहे' या कवितेत कवी म्हणतो.

जनमानसाचा पारमार्थिक प्रवास सुकर.. सुखद व्हावा या उद्देशाने अवतरलेले काव्यधन वाचकांचे आत्मवैभव वाढवणारे आहे. भ्रमित, श्रांत मनास प्रशांतीचा समृध्द अनुभव देण्यासाठी नेमके प्रबोधन कवीने 'अंतर्मुख' या काव्यसंग्रहातून केले आहे. कवीची संवेदनशीलता, भावोत्कटता तितक्याच उत्कटतेने अनुभवून अंतरंगातून बाहेर मराठी माध्यमातून अवतरलेली कवितेला केवळ अनुवाद म्हणता येणार नाही, ती प्रक्रिया म्हणजे एक प्रकारचे अनुसृजनच होय. त्यात अनुसृजक देवनपल्ली यांची साहित्यिक प्रातिभ दिसून येते.

काही कविता समजून घेताना पुन्हापुन्हा वाचाव्या लागतात.. आणि त्यातून नवीन असं काहीतरी गवसत जातं त्यामुळे आध्यात्मिक विचारधन काव्यरुपात मांडणे तसे अवघडच. त्यातही त्या अनुभवाशी तादात्म्य पावून त्या काव्याचा अनुवाद करणे हे तर अधिकच दुष्कर. अनुवादक व्यंकटेश देवनपल्ली हे प्रथितयश साहित्यिक असून वाचकांची मने जिंकणारे कथालेखक आहेत, कादंबरीकार आहेत, चरित्रकार, अनुवादक आणि समीक्षक आहेत. त्याचबरोबर ते एक संवेदनक्षम कवी असल्याचेही त्यांच्या यापूर्वीच्या आमुक्तमाल्यदासारख्या तेलुगु काव्यप्रबंधनाच्या मराठी आणि हिंदी गद्यानुवादातून जाणवले आहे. अंतर्मुखच्या मराठी उत्कृष्ट अनुवादाला अनुवादकर्त्यांचे सखोल आध्यात्मिक चिंतनही पोषक ठरल्याचे दिसून येते. त्यामुळेच कवितेतील स्वतंत्र विचारांना.. मध्यवर्ती कल्पनेला प्राथमिकता देऊन हा ओघवता अनुवाद केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

प्रा. बी.एन. चौधरी यांची या काव्यसंग्रहाला लाभलेली प्रस्तावना म्हणजे एक अनमोल दागिना आहे. पुस्तकाचे देखणे मुखपृष्ठ विषयाला अनुरूप असेच आहे.

## वाढत्या हिंसाचारामागील आंतरराष्ट्रीय पैलू

आरक्षण, अतिक्रमणे आदी कारणांमुळे मणिपूरमधला हिंसाचार भडकत असला तरी एक वेगळे कारण पुढे आले आहे. जसा शेजारच्या म्यानमारचा संबंध मणिपूरच्या हिंसाचाराशी आहे, तसाच थायलंड, लाओस या देशांचाही असल्याचे उघड झाले आहे. मणिपूरमधील हिंसाचारामागील राजकीय कारणे काहीही असली तरी या भागातील अमली पदार्थांचा अवैध व्यापार धुमसत्या सामाजिक परिस्थितीला कारणाभूत असल्याची चर्चा आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून मणिपूर हिंसाचारात होरपळत आहे. आता सर्वपक्षीय बैठका आणि दौरे सुरू असले, तरी अजूनही मणिपूर हिंसाचाराच्या ज्वाळांमध्ये धगधगत आहे. राजकीय आरक्षण, अतिक्रमणे आदी कारणांमुळे तिथे हिंसचार भडकल्याचे सांगितले जात असले, तरी आता त्यामागे एक वेगळेच कारण असल्याचे पुढे येत आहे. शेजारच्या म्यानमारचा संबंध मणिपूरच्या हिंसाचाराशी जोडला गेला. थायलंड, लाओस या देशांकडूनही या हिंसाचाराला प्रोत्साहन मिळत असल्याचे उघड झाले आहे.




मणिपूरमधील हिंसाचारामागील राजकीय कारणे काहीही असली, तरी प्रत्यक्षात या सर्वांमागील प्रमुख कारण म्हणजे या भागातील अमली पदार्थांचा अवैध व्यापार. मणिपूरमधील काही जिल्हे म्यानमार, थायलंड आणि लाओसच्या मोठ्या ड्रग माफियांच्या प्रभावाखाली आहेत. म्यानमार, थायलंड आणि लाओसच्या गोल्डन ट्रँगलमध्ये होणारी ड्रग्जची तस्करी मणिपूरच्या भारत-म्यानमार सीमेवरून पुढे नेली जाते. तज्ज्ञांच्या मते, मणिपूरच्या काही जिल्ह्यांच्या भौगोलिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे म्यानमार, थायलंड आणि लाओसचे बडे ड्रग माफिया तिथे उपलब्ध होणारे स्वस्त मजूर आणि अफूचे चांगले उत्पन्न यामुळे आपला व्यवसाय वाढवत आहेत. दक्षिण आशियातील या राज्यांना उत्तर अमेरिकेतील मेक्सिकोच्या मोठ्या ड्रग कार्टेलचा पाठिंबा असल्याचेही सांगितले जात आहे. कारण जगातील सर्वोत्तम अफूमध्ये म्यानमार आणि मणिपूरची अफू नेहमीच पहिल्या तीन क्रमांकांमध्ये असते. त्यावर प्रक्रिया करून पुढे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हेरॉईनच्या रूपात विकण्याचा धंदा चालतो.

सध्या मणिपूरमधील सुपीक जमिनीवर कुकी समाजातील लोकांचा अफूचा सर्वाधिक व्यवसाय आहे. नव्या समीकरणांमध्ये या समाजाचा जमिनीवरील हक्क कमी होणार आहे. अमली पदार्थांच्या व्यापारातील बदलणाऱ्या समीकरणांमुळे परिस्थिती बिकट होत चालली आहे. आता हजारो एकर क्षेत्रात अफूची लागवड होते. 'नार्कोटिक्स अँड अफेअर्स ऑफ बॉर्डर' या अमली पदार्थविरोधी युनिटच्या मते मणिपूरमध्ये २०१७ ते २०२३ या कालावधीत १५ हजार ४९७ एकरांवर अफूची लागवड झाली होती. कुकी १३ हजार १२२ एकर जमिनीवर अफूची शेती करत असल्याचा दावा करतात, तर नागांचा दोन हजार ३४० एकर डोंगरी जमिनीवर दावा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मैतेई संपूर्ण मणिपूरमध्ये ३५ एकर डोंगराळ जमिनीवर अफू पिकवतात. येथे उत्पादित होणाऱ्या अफूची तस्करी म्यानमारचे बडे ड्रग माफिया स्थानिक लोकांच्या संगनमताने चालवतात. आता नवीन प्रणालीनुसार नागा आणि कुकी समुदायांच्या जमिनींचा मोठा वाटा मिळवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू झाल्याने मणिपूरमधील परिस्थितीला हिंसक वळण लागले आहे. या संपूर्ण प्रकरणात चीन म्यानमारची पाठराखण करत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

मणिपूर, थायलंड, लाओस आणि म्यानमारमधील अमली पदार्थांच्या व्यापारावर लक्ष ठेवणाऱ्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मणिपूरमधील ड्रग्जमागे मोठे अर्थकारण आहे. जगातील अफू उत्पादनापैकी ९५ टक्के अफगाणिस्तान, मेक्सिको आणि म्यानमारमध्ये होते. म्यानमारच्या सीमेला लागून असलेले भारताचे मणिपूर राज्य भौगोलिकदृष्ट्या या पिकासाठी पोषक मानले जाते. म्यानमारमध्येही मोठ्या प्रमाणात अफूची लागवड केली जाते. म्यानमार, थायलंड आणि लाओसमधील मोठ्या ड्रग माफियांनी मणिपूरला अमली पदार्थ उत्पादन आणि व्यापाराचे केंद्र म्हणून विकसित करण्यास मोठ्या प्रमाणात सुरुवात केली आहे. मणिपूरची अफू ही जगातील सर्वोत्तम आणि उच्च दर्जाची म्हणून ओळखली जाते. त्यामुळेच मणिपूरचा सुवर्ण त्रिकोण असलेले म्यानमार, थायलंड आणि लाओस सारखे देश स्वतःच्या फायद्यासाठी इथे अमली पदार्थांच्या व्यापाराला प्रोत्साहन देतात. याशिवाय तिची तस्करीही करतात. मणिपूरमधील अमली पदार्थांच्या व्यापारावर नियंत्रण ठेवणाऱ्या तपास यंत्रणांशी संबंधित सूत्रांचे म्हणणे आहे की, अमेरिका, मेक्सिको, लाओस आणि थायलंडच्या मोठ्या ड्रग कार्टेलचा म्यानमारमधील हस्तक्षेप थेट समोर येत आहे. अमेरिकेची 'ड्रग एन्फोर्समेंट एजन्सी' (डीईए) आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन रिपोर्ट ऑन ड्रग अँड क्राइम'मधील आकडेवारीनुसार, उत्तर अमेरिकेतील मेक्सिकोचे ड्रग कार्टेल जगातील सर्वात मोठे आहे. त्यांच्या कार्टेलशी संबंधित औषध विक्रेते भारतासह युरोपीय महासंघ, अफगाणिस्तान, अमेरिका, आफ्रिका आणि म्यानमारमध्ये मोठा हस्तक्षेप करतात. **क्रमशः**

## शब्दकोडे-११७



आडवे शब्द

१. गुन्हा ५. करमणूक करणारे ८. सडपातळ ११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी! १२. गुजराथी नृत्य प्रकार १४. वर्तुळ १६. भरभराट १९. मुरली, बासरी २०. धोबी २१. सैन्यातील एक हुद्दा २३. घागरा २४. बर्फाचा पर्वत २५. अभय देणे २७. श्रीमंत २८. वहिवाट, शेत २९. संपणे ३०. चुकीचे ३१. करार, भिस्त ३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी ३५. स्वच्छ ३७. घर ३९. विपत्तीची कहाणी ४१. कणसातील दाणे ४३. सज्जनगडचे संत ४४. सार, अर्थ ४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी ४६. वर-वधू ४८. सरहद्द ४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला ५३. युद्ध ५५. लहान ५६. वेल ५८. जादू, भ्रम ५९. बाळाची बोलगाणी ६३. अतिशय हाल ६५. पावसाची झड ६६. राज्यघटना (हिंदी) ६७. गेरु ६८. पडते घेणे ७०. माया, प्रेम ७१. विविध ७३. संध्याकाळ ७४. हनुमान ७५. झकास, सुंदर ७६. राजकारणी यात्रा! ७७. रड्या माणूस ७८. मौल्यवान साठा

उभे शब्द

१. १. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत २. राजाचा कालावधी ३. मोठ्ठीच गंमत ४. ऐट, दिमाख ५. वर्ण ६. सोन्याचा धागा ७. '--- में हड्डी' ८. रस्ता, पथ ९. जिवलग मित्र १०. समशेर १३. लोकांचा समूह १५. नवरा १७. रत्न १८. सूर्य, तापविणारा १९. स्वयंपाकाचे शास्त्र २२. सामान २४. थंडीचे दिवस २५. प्राण २६. आशीर्वाद २७. सावकार, श्रीमंत २८. उत्तराधिकारी २९. शाब्दिक हजामत ३२. दरवाजा ३३. हालचाल ३४. खरकट्याची रास ३६. पळून गेलेला ३८. हिंदीत दहा ४०. ओटा ४२. कर्ण ४४. तमाशा कलाकार ४७. उगाच भटकणे ४९. हस्त ५०. सर्वस्व ५१. भोळा (शंकर) ५२. लोखंडी वस्तूवरील गंज ५४. अभिप्राय ५७. चंद्र ५८. ममता, प्रेम ६०. डोंगर उतरण, ढाळ ६१. डासाचे चावणे ६२. गीत ६४. मिठी ६६. अनुमती, मान्यता ६८. टक, दृष्टी ६९. सहाय्य ७०. वारा ७१. बाई, स्त्री ७२. श्वान ७४. मुलांच्या भाषेत मांजर ७५. सिंहाचे पिल्लू

### शब्दकोडे ११६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नजर ३.हजरजबाबी ८.कडकडाट ११.मधुकर १२.नयनबाण १३.रावण १४.नातलग १५.कलेवर १७.भाकर १८.काढीव १९.रवा २१.विनाशिका २२.लीन २४.नासा २६.कसोटी सामना ३०.रस ३२.परका ३३.लबाडी ३४.महाराज ३५.अतिशय ३७.बारमाह ३९.करवत ४१.रत्नहार ४३.कपास ४६.खडा ४७.नल ५०.राम ५२.वारसदार ५४.रजनीश ५५.शीतल ५७.रज ५८.जळमट ६०.दमा ६१.वानवा ६२.ईश ६३.फस्त ६५.सुमन ६७.पावन ६९.कळवाकळवी ७१.गपगार ७३.लस ७४.पाटील ७६.जनन ७७.दरी ७८.डाका ७९.मनगटी

**उभे उत्तर**

१.नवरात्र २.रमण ३.हकनाक ४.जरतर ५.जनगणना ६.बाय ७.बीन ८.कणकवली ९.कडेवर १०.टन १६.रवाना १७.भामटी १८.काका २०.वाकडा २१अ. शीतलहर २३.नरम २५.सावज २७.साप २८.मरवा २९.खोडी ३१.सहायक ३३.प्रहार ३६.शर ३६अ.यवन ३८.खार ४०.तलवार ४२.हावरट ४४.पारा ४५.समसमान ४६.खलाशी ४८.अंदाज ४९.मनीषा ५१.लालनपालन ५२अ.रजई ५३.रळफळ ५६.तवा ५९.मस्तवाल ६०.दमदाटी ६१अ.वाव ६४.ओळ ६६.काळीज ६८.नगद ६९.करडा ७०.कसम ७२.परी ७४.पाटी ७५.लक्ष्य

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# आम आदमी पार्टीत विविध पदांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आम आदमी पार्टीचा दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून विविध संघटनांचे आणि पक्षांचे असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्षात प्रवेश घेत आहेत. यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर पक्ष वाढत असल्यामुळे पार्टीत विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून पदाधिकारी जाहीर करण्यात आले आहेत.

गोपाल ईटालिया यांनी सदर समितीची घोषणा करताना सांगितले की, यापुढे महाराष्ट्रातील नवनियुक्त राज्य पदाधिकारी महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेपर्यंत आम आदमी पार्टीची ध्येय धोरणे तसेच दिल्ली आणि पंजाबमधील जनहिताची केलेल्या कामांची माहिती राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवितील. तसेच राज्याच्या प्रत्येक गावात, तालुक्यात आणि जिल्ह्यात लोकांच्या समस्या सोडविण्याचे आटोकाट प्रयत्न करतील. भ्रष्टाचाराविरोधात पार्टीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी काम करतील असेही ईटालिया यांनी सांगितले.

राज्य संघटनेच्या नियुक्तीत स्टेट कॅम्पेन ईन्चार्ज रंगा राचुरे, उपाध्यक्ष विजय कुंभार, उपाध्यक्ष धनंजय शिंदे, संघटन सचिव संदीप देसाई, अजित फाटके, नविंदर सिंग अहलुवालिया, भूषण धाकुळकर, मनिष मोडक, हनुमंत चाटे, अजित खोत, रियाज पठाण, महिला आघाडी अध्यक्षा सीमा गुट्टे, युवा आघाडी अध्यक्ष मयूर दौंडकर, राज्य मीडिया प्रमुख चंदन पवार, समिती सदस्य देवेंद्र वानखेडे आणि संजय कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आप पार्टीला आणखी मजबूत बनवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात राज्यापासून तर तालुकापर्यंत आणखी मोठ्या प्रमाणात नियुक्त्या दिल्या जातील असे गोपाल इटालिया यांनी सांगितले आहे.

## नरेडको नाशिककडून ना. भुजबळ यांची सदिच्छा भेट

**नाशिक ।** गेल्या आठवड्यात राज्य मंत्रिमंडळात नव्याने कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश झालेल्या ना. छगन भुजबळ यांची सदिच्छा भेट नरेडको नाशिकच्या वतीने घेण्यात आली. यावेळी नाशिक शहराच्या विविध अडचणींबाबत मार्गदर्शन घेण्यात आले. यात प्रामुख्याने नाशिक मनपा आयुक्त यांची गेल्या २ महिन्यापासून रिक्त असलेल्या जागेकरिता भारतीय प्रशासन सेवा अधिकारी यांची मागणी करण्यात आली.

नाशिकचे स्थानिक प्रश्न, कुंभमेळा, जाचक घरपट्टी दरवाढ, एमआयडीसीसाठी असलेल्या जागेचे दर, शहर विकासाच्या संधी, रिंगरोड अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. जाचक घरपट्टी दरवाढ व एमआयडीसीसाठी असलेल्या जागेचे दर यावर सत्वर कार्यवाही करण्याचे भूमिका ना. भुजबळ यांनी मांडली. तसेच नाशिक जिल्ह्याच्या अडी-अडचणी यांची ठळकपणे नोंद घेऊन विषय मार्गी करण्याचा मनोदय व्यक्त केला.

---

**ॲड. निलेश एकनाथ चौधरी**
**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**
**दि.कि.अ.नं. २०१/२०२३**

१) कविता अमृत अहिरे, वगैरे ....**अर्जदार**
**विरुध्द**
कोणीही नाही ..**जाबदेणार**

### जाहिर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक ०६/०७/२०२३ रोजी दि कि. अर्ज नं. २०१/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत अमृत बालू अहिरे यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. ३०/०८/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाया तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ:- साक्री
दिनांक :- १०/०७/२०२३

(शिक्का)

**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय साक्री** — **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय साक्री**

---

**ॲड. निलेश एकनाथ चौधरी**
**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**
**दि.कि.अ.नं. १७३/२०२३**

१) मंजुळाबाई राघो अहिरराव, वगैरे ....**अर्जदार**
**विरुध्द**
कोणीही नाही ..**जाबदेणार**

### जाहिर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक १९/०६/२०२३ रोजी दि कि. अर्ज नं. १७३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत विक्रम राघो अहिरराव यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. ०९/०८/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाया तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ:- साक्री
दिनांक :- १०/०७/२०२३

(शिक्का)

**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय साक्री** — **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड.प्रकाश डी. देवरे, साक्री**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**
**दिवाणी कि. अर्ज क. १९८/२०२३**

श्रीमती. पुष्पाबेन पंडितभाई सोने / विसपुते वै. ४,
उ.व.-६४, धंदा-काहीनाही,
राहणार- पिंपळनेर, भोईगल्ली, ता.साक्री, जि.धुळे........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही** ........**सामनेवाला**
कै.पंडित पांडुरंग सोनी/विसपुते
(मृत्यू दिनांक-२३/१२/२०१४) ...**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो., यांचे कोर्टात मुंबई वारस कायदा १८२७ चे खंड ८ अन्वये कै. पंडित पांडुरंग सोनी / विसपुते यांचा वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. याकामी इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदरची जाहिर नोटीस काढण्यात आली असुन मयताचे कायदेशिर वारस पुढील प्रमाणे आहेत.

१. श्रीमती. पुष्पाबेन पंडितभाई सोनी/विसपुते,
२. श्री. राकेशभाई पंडितभाई सोनी/विसपुते,
३. श्री. जयेशभाई पंडितभाई सोनी/विसपुते,
